# जळगांव जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, जळगांव.

**(कालावधी दि. ०१/०५/२०२४ ते ३१/०३/२०२६)**

## अटी व शर्ती :

१. आंतरिक स्वच्छता ठेका (पशुखाद्य कारखाना) ठेक्याचा कालावधी कमीत कमी १ वर्ष व जास्तीत जास्त २ वर्षाचा राहील.

२. निविदा दरपत्रक फार्मची **किंमत रुपये ५९०/-(जी.एस.टी.सह)** राहील.

३. निविदा फॉर्म भरतांना निविदा सुरक्षा अनामत रक्कम भरणे आवश्यक राहील ती पुढील प्रमाणे--

| निविदा क्र. | तपशिल | निविदा सुरक्षा अनामत रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | आंतरिक स्वच्छता ठेका (पशुखाद्य कारखाना) **प्रती बॅग प्रमाणे** | १०,०००/- |
| **सदरील रक्कम ही खालील खात्यात आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी./डीमांड ड्राफ्ट द्वारे स्विकारण्यात येईल.** | | |
| **JALGAON JILHA SAHAKARI DUDH UTPADAK SANGH MARYADIT**<br>Account No. : 10778444028<br>Bank Name : State Bank of India,<br>Branch : ADB, Ring Road, Jalgaon 425001.<br>IFSC Code : SBIN0003295 | | |
| **आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी./डीमांड ड्राफ्ट व्यतिरिक्त आलेल्या रक्कमा स्विकारण्यात येणार नाही.** | | |

४. दरपत्रक विक्री व स्विकारण्याचा कालावधी **दि. १७/०४/२०२४ ते दि. २५/०४/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते सांय. ५.०० वाजेपर्यंत सुटीचे दिवस सोडून) राहील.**

५. ठेकेदाराने स्वतंत्र दरपत्रक भरणे आवश्यक राहील.

६. निविदा धारकास कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

७. निविदा धारक हा संचालक मंडळ सदस्य व त्यांचे निकटचे नातेवाईक आणि संघात कार्यरत कर्मचारी व त्यांचे निकटचे नातेवाईक नसावा. ठेका दिल्यानंतर असे आढळल्यास सदरील निविदाधारकची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन ठेका रद्द करण्यात येईल.

८. निविदाधारकाने एका ठेक्यासाठी स्वतंत्र असे दोन पाकीट अ) पात्रते संबंधीत आवश्यक दस्तऐवज ब) दरपत्रक (कमर्शियल डिटेल्स) द्यावेत. टेंडर उघडतांना प्रथम पात्रते संबंधीत आवश्यक दस्तऐवज संबंधातील पाकीट उघडले जाईल. पात्रते संबंधीत आवश्यक दस्तऐवज देण्यास असमर्थ ठरल्यास किंवा अपुर्तता असल्यास दुसरे पाकीट न उघडता सदर टेंडर धारकास बाद ठरविण्यात येईल.

९. निविदाधारकाने टेंडर सादर करते वेळी पात्रते संबंधीत आवश्यक दस्तऐवज संबंधातील पाकीट सादर करतांना त्यासोबत नोंदणी प्रमाणपत्र, पी.एफ. नोंदणी क्रमांक, ई.एस.आय. प्रमाणपत्र, ठेकेदाराचे मनुष्यबळ पुरविण्याचे लायसन्स व इतर संबंधीत कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती सादर करणे बंधनकारक आहे व राहील. ठेक्या संबंधीत आवश्यक कागद्प्रत्र सादर न केल्यास टेंडर धारकास बाद ठरविण्याचा अधिकार संघास आहे व राहील.

१०. ज्या ठेक्यासाठी निविदा द्यावयाची आहे. त्या ठेक्याचे नावाचा उल्लेख स्पष्टपणे उल्लेख पाकीटावर करुन दरपत्रक भरणाऱ्याचे नांव नमुद करावे.

११. निविदाधारका मार्फत पुरविण्यात येणाऱ्या कामगारांचे वय हे १८ वर्षापेक्षा कमी व ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे. तो शारीरिक व वैद्यकिय दृष्ट्या सुदृढ असावा. तसेच त्यास मराठी भाषेचे ज्ञान असावे.

१२. संघाने ठेका दिल्यानंतर ठरवून पध्दती व सुचने नुसारच कामकाज व्यवस्थित पूर्ण करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

<u>सुरक्षा अनामत :</u>

- आंतरिक स्वच्छता ठेका (पशुखाद्य कारखाना) ठेक्याचे कार्य आदेश दिल्यानंतर कामकाज सुरु करण्यापुर्वी **रक्कम रुपये १,००,०००/- अक्षरी रक्कम रुपये एक लाख मात्र** सुरक्षा अनामत म्हणून संघात भरावी लागेल.
- ठेक्याच्या कालावधीत संघाचे काही नुकसान झाल्यास किंवा अटी व नियमांचे उल्लंघन केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
- सुरक्षा अनामत रक्कम भारतीय चलनाप्रमाणे राहील.
- सुरक्षा अनामत रक्कम एन.ई.एफ.टी. / आर.टी.जी.एस. द्वारे ठेका मिळाल्यानंतर ७ दिवसांचे आत संघाकडे जमा करावी लागेल.
- सुरक्षा अनामत ठेका कालावधी पुरतीच मर्यादीत राहील.
- सुरक्षा अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

**निविदा : आंतरिक स्वच्छता ठेका (पशुखाद्य कारखाना, नशिराबाद) प्रती बॅग प्रमाणे**

**<u>कामकाजाचे स्वरुप</u>**

- कच्चा मालाची पोती ट्रक मधून उतरवून गोडावून मध्ये (चौथड) लावणे,
- कच्चा मालाची पोती इंटेकसाठी हॉपरवर लावणे व खाली करणे,
- गोडावून बाहेरील पोते इंटेकसाठी हॉपरवर लावणे व खाली करणे,
- प्रिमिक्ससाठी बाहेरच्या ओट्यावरुन इनटेकसाठी पोती हॉपरवर लावणे व खाली करणे,
- एक थप्पी वरुन दुसऱ्या थप्पीवर पोते लावणे,
- रिकामे बारदान (कच्चा मालाचे) हाताने साफ करुन ५० चे गठ्ठे बांधून चौकडा लावणे,
- खराब झालेल्या मालाचे पोते बाहेर उकिरड्यावर फेकणे व रिकामे पोते गोडावून मध्ये आणणे,
- चौकडा बरोबर करण्यासाठी पोते ठेवणे, जूने बारदान ज्युट बंडल वाहनात भरणे,
- जूने प्लॅस्टीक लहान व मोठे बारदान बंडल वाहनात भरणे,
- गोडावून मध्ये विखुरलेल्या स्वरुपातील मालाचे पोते भरुन इनटेक करणे,
- कच्चा मालाची गाडी खाली करतांना गाडीत पडलेला सुट्या स्वरुपातील मालाची पोती भरुन गोडावून मध्ये थप्पीवर लावणे,
- पक्का माल गाडीत भरणे, पक्का मालाचे पोते बॅगींग करुन गोडावून मध्ये थप्पी लावणे,
- स्लॅट कन्व्हेअर वरील मॅश मिश्रीत पोते मोलॅसेस मशिन जवळ लावणे,
- नवीन बारदानाची गाठण ४०० नग पोते (ट्रक मधून उतरविणे) खाली करणे,
- गठाण दुसऱ्या व तिसऱ्या थप्पीवर चढविणे किंवा एकीकडून दुसरीकडे नेणे,
- नवीन बारदानाची गठाण ३०० नग पोते खाली करणे,
- नविन बारदान गठाण दुसऱ्या / तिसऱ्या थप्पीवर चढविणे किंवा एकीकडून दुसरीकडे नेणे,
- नवीन बारदानाची तपासणी करुन ५० नगाचा एक गठ्ठा या प्रमाणे गठ्ठे तयार करणे,
- उत्पादनासाठी मिनरल, युरिया, मीठ, कॅलसाईट व इतर मटेरिअल्सची बॅच तयार करणे,
- खराब झालेले मालाचे पोते बाहेर उकिरडयावर फेकणे,
- रिकामे पोते गोडावून मध्ये आणणे,
- तळमजल्या वरील अथवा वरच्या मजल्यावर ठेवलेले पोते इनटेक साठी लावणे व खाली करणे,
- पक्का मालाचे फाटलेले पोते शिलाई करणे,
- गठाणचे कल्तानाचे गठ्ठे तयार करुन चौकडा लावणे,
- भूयारी घरातील सांडलेला / विखुरलेला कच्चा माल जमा करुन पोत्यात भरुन ठेवणे,
- पक्का मालाच्या गोडावून मधील झाड-झूड केलेला कचऱ्यात पशुखाद्याची कांडी असल्यास ती जमा करुन इंनटेक साठी पाठविणे व उर्वरित कचरा उकिरड्यावर टाकणे,
- नवीन बारदान रिजेक्टेड असल्यास त्याचे ५० चे गठ्ठे बांधून चौथडा लावणे इ.